E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# राजेशभैया टोपे एक विकासाभिमूख अजातशत्रू नेतृत्व

**प्रा. रवींद्र दिगंबर पैठणे**
मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
अंबड, जि. जालना.
Mo. 9404609552, E-mail: ravindrapaithane23040@gmail.com

नेतृत्व हे व्यवस्थापनाच्या अनेक तत्त्वांपैकी एक महत्त्वाचे तत्व आहे. कोणत्याही कार्याच्या अंमलबजावणीत नेतृत्वा ची अत्यंत गरज असते. समाजाला एका नियोजित ध्येयपूर्तीकडे घेऊन जाण्यासाठी आणि कार्याचे नियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी अनेकदा योग्य नेतृत्वाची गरज असते राज्यशास्त्राच्या एक अभ्यासिका मेरी पार्कर फॉलेट आपल्या ' Leader & Expert' या लेखात नेतृत्वाबाबत विचार मांडतांना असे म्हणतात, “केवळ प्रभुत्व स्थापन करणे म्हणजे नेतृत्वाचे वास्तविक वैशिष्ट्य नव्हे तर,जे आपल्या समूहात व भागातील जनतेत उत्साह व शक्ती निर्माण करू शकते.पुढे जाऊ इच्छिणा-याला प्रोत्साहित करते अशी व्यक्ती नेता असत.” आणि नेतृत्वाच्या या संकल्पनेत आपल्या भागातील उमदे नेतृत्व माजी आरोग्यमंत्री राजेशभैय्या टोपे साहेब चपखलपणे बसतात. आदरणीय कर्मयोगी अंकुशराव टोपे साहेब यांच्या कार्यसातत्य या सिद्धांताला व विचारसरणीला प्रमाण मानून निष्काम कर्म विचारसरणीचा अंगीकार करणारे नेतृत्व म्हणून आज भैय्यासाहेबांकडे पाहिले जाते.

कौटिल्याने आपल्या सुप्रसिद्ध अशा ‘अर्थशास्त्र’ या महान ग्रंथात म्हटले आहे की, 'प्रजेला प्रसन्न ठेवणे हा राजाचा एक सनातन धर्म आहे'.आज लोकशाही विचारसरणीच्या काळात जनहिताची विकासात्मक कार्य करून जनतेला प्रसन्न व समाधानी ठेवणे हे आजच्या नेतृत्वाचे कर्तव्य व सनातन धर्म आहे आणि हेच जनसेवेचे व जनतेच्या सर्वांगीण विकासाचे कार्य आदरणीय भैय्यासाहेब नेतृत्वाचा सनातन कार्यधर्म म्हणून पार पाडत आहे.विशेष म्हणजे जात,धर्म,वर्ग,लिंग तर सोडाच पण राजकारणाच्याही पलीकडे जाऊन अगदी नि:पक्षपातीपणे मानवता धर्म या नात्याने विकास कार्य करत आहे.

**" जीव हमारी जाती है ।**
**मानव धर्म हमारा ॥**
**हिंदू- मुस्लिम- सिक्ख - ईसाई ।**

**धर्म नही कोई न्यारा ॥ "**

**देश -काळ वस्तू भेद मावळता ।**

**आत्मा निवळिला विश्वाकार ॥**

**विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म।**

**भेदाभेद भ्रम अमंगळ॥"**

ज्ञानगंगा विचार व राष्ट्रसंत तुकोबारायांच्या या संतोक्तीप्रमाणे आज भैय्यासाहेब धर्म,जात,वर्ग,लिंग नव्हे नव्हे राजकीय भेद अशा 'रूढ भेदांना लाभते समाप्ती' समजून कार्य करत आहे. त्यामुळेच आजच्या वाढत्या हेवे-दावे व द्वेषाच्या राजकारणाच्या काळातही एक 'आजातशत्रू 'अशी प्रतिमा व ओळख सबंध महाराष्ट्र भर भैय्यासाहेबांनी निर्माण केली आणि त्याची प्रचितीही त्यांच्या महाराष्ट्र राज्याचे आरोग्य तथा कुटुंब कल्याण मंत्री असतानाच्या काळात 'कोरोना योद्धा' म्हणून त्यांनी केलेल्या कार्यातून महाराष्ट्रातील लाखो लोकांना आली.' वसुधैवं कुटुंबकम् ' या विचारधारेप्रमाणे सबंध महाराष्ट्र नव्हे नव्हे तर सबंध देशाला आपले कुटुंब मानून आपल्या जिवाची पर्वा न करता आणि प्रसंगी कौटुंबिक जबाबदारी व समस्या बाजूला ठेवून प्रचंड इच्छाशक्ती,आत्मीयता व तन्मयतेने त्यांनी कार्य केले त्यामुळेच महाराष्ट्र व देशाने त्यांच्या कोविड-19 च्या कार्याची दखल तर घेतलीच पण एवढेच नव्हे तर संयुक्त राष्ट्र संघटने अंतर्गत जागतिक आरोग्याची दखल घेणा-या डब्ल्यू.एच.ओ.(WHO - World Health Organisation) अर्थात जागतिक आरोग्य संघटनेनेही त्यांच्या कार्याची दखल घेतली हे विशेष व हे त्यांच्या उत्तम नेतृत्वाचे मूर्तीमंत उदाहरण होय.

नेतृत्व समाज निर्माण करतो की समाज नेतृत्व निर्माण करतो हा पूर्वीपासूनचा म्हणजे अगदी शांतीपर्वापासूनचा प्रश्न आहे.

**कालो वा कारणम राजो,**

**राजा वा काल कारणम ।**

**इतितो संशयो मा भूत ,**

**राजा वा कालस्य कारणम ॥**

पण भैयासाहेबांचे कर्तृत्व व नेतृत्व पाहिल्यानंतर नेतृत्व समाज निर्माण करतो आशी परिस्थिती त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून निर्माण केली. आज समाजात अनेक प्रकारचे लोक नेतृत्व करत असतात पण काही नेतृत्व करणारे लोक केवळ बडबड करण्यात पटाईत असतात.तर काही लोक बोलण्यापेक्षा कृती करण्याला महत्व देतात त्यापैकी भैय्यासाहेब एक होय.

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

**" करे अल्पज्ञानी बहु बडबडाट**

**जसा निर्झराचा अति**

**खळखळाट**

**असे पूर्णज्ञानी कमी बोलणारा**

**विना नाद वाहे जशी गंगाधारा "**

या संतोक्तिंनुसार निर्झरासारखा केवळ खळखळाट करण्यापेक्षा गंगाधारेसारखे संत वाहत अवघा मतदार संघ नव्हे नव्हे अवघा भाग विकास कामांनी चिंब करणारा एक अभ्यासू दमदार नेता जर कोण असेल तर ते भैय्यासाहेब होय. शांत, संयमी,कणखर,मितभाषी, कल्पक नेतृत्व म्हणून आज त्यांच्याकडे पाहिले जाते ते त्यांच्या कर्तुत्वामुळे.

याबरोबरच ' एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ' हे सहकार चळवळीचे घोषवाक्य व ' विना सहकार नाही उद्धार' हे सहकार चळवळीचे ब्रीद वाक्य घेऊन महाराष्ट्रात जी सहकार चळवळ उभा राहिली त्याच धर्तीवर आपल्या परिसरात सहकारी संस्था उभा करण्याचे काम कर्मयोगी साहेबांनी केले.तो सहकाराचा समर्थ वारसा भैय्यासाहेबांनी पुढे चालवत, एवढेच नव्हे तर त्यात आणखी भर घालत समाजाच्या सार्वंगीण विकासात व अनेकांच्या रोजगारीचा प्रश्न सोडविण्याच्या कार्यात हातभार लावण्याचे पवित्र कार्य केले. सहकाराच्या विकासासाठी सिंचनाचे महत्व लक्षात घेऊन,

**नगरेची रचावी । जलाशये**

**निर्मावी ॥**

**महावने लावावी। नानावीध ॥"**

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या या उक्तीचा अंगीकार करत गावागावात पाणलोट विकासाचे अद्वितीय असे कार्य करून आपल्या भागाला जलसंधारणाच्या क्षेत्रात गतिमान करण्याचे महान असे कार्य साहेबांनी केले. त्यामुळेच आपल्या भागात सहकाराचे जाळे विणल्या गेले व त्यातून शिक्षणाला,शेतीविकासाला व अर्थकरणाला गती मिळाली हा त्यांच्या विकासाभिमुख कार्याचा अविष्कार होय.डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या एका लेखात म्हणतात ' “माणसाची योग्यता त्यांनी केलेल्या त्यांच्या कार्यावरून मोजली जाते. नुसते भाषणे देउन कोणी महापुरूष किंवा नेता होत नाही.” अशाप्रकारे केवळ बोलणारे नव्हे तर कृतिशील व्यक्तिमत्त्व म्हणून उभा महाराष्ट्र आज भैय्यासाहेबांकडे पाहतो यातच त्यांच्या कार्याचे श्रेष्ठत्व दडलेले आहे.आणि एवढेच नव्हे तर आपल्या विकासवेधक

कार्यकर्तृत्वामुळेच जनतेचे प्रेम व जिव्हाळा एवढा की आज साहेब सर्वसामान्यांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत त्यांच्यासाठी चार ओळी.....

महाराष्ट्राच्या आरोग्याची पालखी समर्थपणे पेलवणारे, कर्तुत्वाच्या आसमंतात गरूड झेप घेणारे,रखरखत्या निखा-यावर चालूनही निष्ठेचे दायीत्व सिध्द करणारे,दमदार व्यक्तिमत्व म्हणजे भैय्यासाहेब.....

**संदर्भग्रंथ सूची**

1. गोंडे गोविंद - 2019,संघर्ष जनता जनार्दनासाठी,ॲपल डिझायनर ,छत्रपती संभाजीनगर.
2. राखुंडे दीपक - 2022,वचनपुर्ती,ॲपल डिझायनर,छत्रपती संभाजीनगर.
3. पाटील पी.बी. - 2009,महाराष्ट्र शासन व राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स ,छत्रपती संभाजीनगर.
4. राखुंडे दीपक - 2024,बांधिलकी,ॲपल डिझायनर,छत्रपती संभाजीनगर.
5. मेरी पार्कर फालेट - " Leader & Export "लेख